**कोतवालांना गट-ड (वर्ग-४) मधील पदांवरील नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक : सव३०/४२००/प्र.क्र.६३५/ई-१०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : १९.७.२००१.**
वाचा : शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक २२.३.२००१.

कोतवाल हे महसूल विभागाच्या अधिपत्याखालील अवर्गीकृत कर्मचारी असल्याने त्यांना फक्त महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेल्या कार्यालयातील गट-ड मधील नियमित पदांवरील किमान वेतनश्रेणी प्रथम नियुक्तीच्या पदांवरील नेमणुकीसाठी कोतवाल भरती व नेमणूक याबाबतच्या दिनांक ७ मे १९५९ च्या शासन निर्णयातील नियम २२ येथील तरतुदीप्रमाणे पुढील अटींवर प्राधान्य देण्यात यावे असे उपरोक्त शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

१) गट - ड मधील पदाकरीता शासनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेली असावी.

२) कोतवालांना सेवेत घेण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४० पर्यंत विहीत केलेली असल्याने त्यांना गट-ड मधील पदांवर नियुक्ती मिळण्याकरीता उच्चतम वयोमर्यादा ४५ पर्यंत शिथिल करण्यात यावी.

३) गट - ड मधील नियुक्ती ही नवीन नियुक्ती समजण्यात यावी व कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्याने त्या पदावरील सेवेचा विचार कोणत्याही कारणास्तव वर्ग-४ च्या पदावरील सेवेचे फायदे देताना करण्यात येऊ नये.

या संदर्भात झालेल्या सुनावणीच्या वेळी मा. न्यायाधिकरणाने दिलेले निदेश लक्षात घेऊन कोतवालांनी वर्ग-४ च्या पदावर प्राधान्य देतांना पुढील बाबींचा विचार करण्यात यावा :

१) जिल्हा हे एक घटक ( Unit) गृहीत धरण्यात यावे व कोतवालांची जिल्हास्तरीय ज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. सुरुवातीला ही यादी तयार करुन त्याबाबतच्या हरकती ( Objection) मागविण्यात याव्यात. त्या तपासून यादीला अंतिम स्वरुप देण्यात यावे व ती प्रसिध्द करण्यात यावी.

२..

२) उच्चतम वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असलेल्या कोतवालांची नावे या यादीमधून वगळण्यात यावीत उर्वरित कोतवालांकडून (कमीत कमी पाच वर्षे सेवा झालेल्या ) वर्ग-४ मध्ये नियुक्तीसाठी ते इच्छुक आहेत काय याबाबत त्यांचेकडून माहिती घेण्यात यावी. जे इच्छुक नसतील त्यांची नावे वगळण्यात यावीत.

३) त्यानंतर किती पदे भरावयाची आहेत हे निश्चित करुन १:५ या प्रमाणात विचारक्षेत्रात येणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करावी. ( Zone of Consideration ) कोतवालांना वर्ग-४ च्या पदावर पदोन्नती देतांना वर्ग-४ च्या मंजूर पदांची संख्या लक्षात घेऊन प्रमाण (Percentage) निश्चित करण्यात यावे.

यानंतर जे कोतवाल विचार क्षेत्रात येत असतील त्यांची यादी तयार करुन वर्ग-४ च्या पदावरील नियुक्तीसाठी पुढीलप्रमाणे १०० गुणांपैकी गुण देऊन पुढील मुद्दे विचारात घेऊन गुणवत्तेनुसार वर्ग-४ साठी निवड करण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | विचार क्षेत्रात येणारे उमेदवार | -- | ३५ गुण |
| ब) | शैक्षणिक अर्हता, एस.एस.सी. व अधिक | -- | १० गुण |
| क) | पाच वर्षांवरील सेवा<br>प्रत्येक वर्षाच्या सेवेकरीता | -- | ३ गुण |
| ड) | मौखिक/व्यक्तिमत्व चाचणी<br>( यामध्ये कोणत्याही उमेदवारास ३ पेक्षा कमी व आठ पेक्षा जास्त गुण देण्यात येऊ नयेत) | -- | १० गुण |

वरीलप्रमाणे गुणानुक्रमे उमेदवारांची यादी तयार करुन त्यांना वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्यात यावी. महसूल विभागांतर्गत असणाऱ्या वर्ग ४ (गट-ड) च्या किमान वेतनश्रेणीत प्रथम नियुक्तीच्या पदांपैकी नियमित पदांमधून १०% पदे राखीव ठेवण्यात यावीत.

उपरोक्त सूचनांचे अनुषंगाने कोतवालांना गट-ड (वर्ग-४) च्या पदावर नियुक्ती देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रज्ञा स. म्हाले)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी
सर्व विभागीय आयुक्त.
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
कार्यासन अधिकारी वित्त विभाग ( सेवा-३/व्यय-९/अर्थसंकल्प-१९) मंत्रालय, मुंबई ३२.
कार्यासन अधिकारी, ई-१०, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.( निवडनस्ती )